## नवीन कनिष्ठ महाविदयालयांना परवानगी

शासन वेळावेळी जाहीर प्रकटन करुन नवीन कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्यास परवानगी देणेसाठी जिल्हा व राज्यसमिती मार्फत प्रस्ताव मागविले जातात. शासनाकडून नवीन कनिष्ठ महाविद्यालयांना सुरु करण्यास परवानगी मिळाल्यानंतर शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून परवानगी दिली जाते. त्यानंतर परवानगी पत्रातील आदेशातील अटींची पूर्तता केलेबाबतचा शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे मार्फत अहवाल प्राप्त झालेनंतर या कार्यालयाकडून कनिष्ठ महाविद्यालयांना प्रथम मान्यता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रं. ३.१, ३.२, ३.३ व ५.१ प्रमाणे दिली जाते.

## अतिरिक्त शाखा / जादा तुकडया

दरवर्षी विदयार्थी संख्यामध्ये वाढ झाल्यामुळे मागणी प्रमाणे ज्या संस्था अतिरिक्त शाखा व जादा तुकडयांची मागणी करतील त्यांना विदयार्थी संख्येची अट पूर्ण करतील व कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास तयार असलेबाबतचे हमीपत्र देतील, शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे शिफारशीनुसार कायम विना अनुदान मान्यता दिली जाते. व त्यास शासनाची कार्योत्तर मंजूर दिली जाते.

## इ. १२ वी च्या वर्गांना नैसर्गिक वाढीने मान्यता देणे

ज्या कनिष्ठ महाविदयायास इ. ११ वी चे वर्ग मंजूर झाले आहेत त्या वर्गांना त्यापुढील वर्षी नैसर्गिक वाढीने कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिली जाते.

## जादा वैकल्पिक विषयास मान्यता देणे

इ. ११ वी व १२ वी च्या वर्गासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने निश्चित केलेल्या विषयापैकी कनिष्ठ महाविद्यालयांच्या मागणी नुसार जादा वैकल्पिक विषयास मान्यता देऊन विभागीय सचिव माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे शिफारस केली जाते. त्या विषयास किमान २० पेक्षा जादा विदयार्थी असणे आवश्यक आहे आहे. तसेच आवश्यक शैक्षणिक अर्हतेचे प्रशिक्षित शिक्षक नियुक्त करणे संस्थ्ेवर बंधनकारक असेल.

## माहिती तंत्रज्ञान विषय

इ. ११ वी व इ. १२ वी चया वचर्गास मराठी विषसास वैकल्पिक व जादा विषय कनिष्ठ महाविद्यालयांना कायम विना अनुदान तत्वावर विषय सुरु करता येतो. सदर वर्गास एका तुकडीत ६० पर्यंत विदयार्थी हा विषय घेऊ शकतात संस्थ्ेने पुरेसे संगणक उपलब्ध करुन देणे संस्थ्ेवर बंधनकारक असेल. या विषयास आवश्यक शैक्षणिक अर्हतेचे प्रशिक्षित शिक्षक नियुक्त करणे संस्थ्ेवर बंधनकारक आहे. प्रथम ६० च्या तुकडीस रु. ५०००/- एचएससी बोर्डात भरणे आवश्यक आहे. त्यानंतर इ. ११ वी च्या वर्गास अंतिम मान्यता दिली जाते. त्यापुढील शैक्षणिक वर्षात इ. १२ वी च्या वर्गास नैसर्गिक वाढीने मान्यता दिली जाते. (कायम विना अनुदान )

जा.क्रं./उमाशि-१/पुवि/मा-तंत्र/विषय/मान्यता/२००-
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक :

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
--------------------------------
--------------------------------

विषय :- माहिती तंत्रज्ञान या विषयास मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. ----------- यांचे
दि. / /२०० चे पत्र
२. आपले क्रमांक

वरील विषयाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, आपण उपरोक्त अनुक्रमांक १ व २ नुसार माहिती तंत्रज्ञान या विषयास मान्यता मिळण्यासंबंधीच्या प्रस्तावाची छाननी करण्यात आली. त्यानुसार आपणास खालील प्रमाणे सन २०० – २०० या शैक्षणिक वर्षापासून विषय मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी शासन निर्णय दिनांक ५ जुलै २००१ मधील अटींचे /शर्तीचे तसेच राज्य मंडळाचे परिपत्रक क्रं. रामं/पाठक्रम/४१५९/ दि. १२ जुलै २००१ मधील अटींचे पालन करणे आपणास बंधकारक राहील. तसेच माहिती तंत्रज्ञान विषयाच्या शाखानिहाय मान्य तुकडीत ६० पेक्षा जादा विदयार्थी या विषयास प्रवेश दिल्यास त्या जादा विदयार्थ्यांना इ. १२ वी पीरक्षेस प्रविष्ठ होण्यास परवानगी दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.न. | शाखा | इयत्ता | तुकडी क्रमांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | कला | | | कायम विना अनुदान तत्वावर मान्यता |
| २ | वाणिज्य | | | कायम विना अनुदान तत्वावर मान्यता |
| ३ | विज्ञान | | | कायम विना अनुदान तत्वावर मान्यता |

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व योगय त्या कार्यवाहीसाठी

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, . . . . .

२. मा. विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, पुणे -५. / मुंबई

कायम विना अनुदान

जा.क्र. उमाशि-१/नविन मान्यता इ. ११ वी/पुवि/२०० -
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :

प्रति,

अध्यक्ष/सचिव

विषय : सन २० - २० या शैक्षणिक वर्षात नवीन उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी व्या वर्गास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत . . .

संदर्भ : १) क्रमांक :एच.एस.सी./१७०८/(१८१/०८(क),उमाशि-१ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२ दि. २९ ऑगस्ट २००९
२) क्रं. एच.एस.सी./नशा प्र/२००८-०९/शा.मा./१२ एच एस/९१५६ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे दि.१०.०९.२००९

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, आपल्या उच्च माध्यमिक शाळेस शासन पत्र क्रमांक एच.एस.सी./१७०८/(१८१/०८(क),उमाशि-१ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२ दि.२९ ऑगस्ट २००९ मधील व त्याशिवाय खालील अटींच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०० – २०० पासून कायम विनाअनुदान तत्वावर . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .या विद्यालयास खालील नमूद केलेल्या इयत्ता ११ वी साठी परवानगी देण्यात येत आहे.

सदर संस्थांनी माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी चे वर्ग सुरु करण्यांस परवानगी देण्यात येत आहे.

| इयत्ता | शाखा | | | | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | | |
| इयत्ता ११ वी | | | | | | कायम विना -अनुदान तत्वावर मान्यता सन २०० - २०० |
| माध्यम | | | | | | |

अटी :

१. सदर संस्थांना मान्य केलेल्या उच्च माध्यमिक वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत आहे. भविष्यात कधीही अनुदान किंवा कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत किंवा फी चा परतावा दिला जाणार नाही. याबाबतचे संस्थेचे अध्यक्ष यांचेकडून लेखी रुपये १०/- कोर्ट फी स्टॅम्प लिहून देणे आवश्यक राहील.

२. सदर उच्च माध्यमिक शाळेस शासनाने वेळावेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनिमय अधिनियम १९७७ व त्याखालील नियमावली १९८१ मधील तरतुदीची काटेकोरपणे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. शासनाच्या पुर्वपरवानगीचे निश्चित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिक शुल्क विद्यार्थ्याकडून संस्थेस आकारता येणार नाही.

४. संस्थेच्या अध्यक्षाने कायम विना अनुदान तत्वावर उच्च माध्यमिककचे वर्ग चालविण्यास तयार असलेबाबत रुपये १०० च्या कोर्ट स्टॅम्प पेपवर शपथपत्र देणेबाबत बंधनकारक राहील.

५. सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

६. कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली ‘उच्च माध्यमिक शाळा’ असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबंधीत संस्थेवर बंधनकारक राहील.

७. ‘कायम विनाअनुदानीत शाळा’ अशा प्रकारचे लेटरहेड सदर संस्थेने नियमित वापरणे आवश्यक आहे.

८. संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

९. सदर संस्थांमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही. असे हमीपत्र सादर करावे लागेल. संस्थेकडून विहित मुदतीत चलन व प्रस्ताव दाखल करण्यात आलेला असला पाहीजे.

१०. प्रस्तृत संस्थेस इयत्ता ११ वी चे वर्ग सुरु करण्यास दिलेल्या परवानगीने परिसरातील सध्या सुरु असलेल्या उच्च माध्यमिक शाळांच्या / कनिष्ठ महाविद्यालयांच्या पटसंख्येवर विपरीत परिणाम होणार नाही ही बाब संस्थेवर बंधनकारक राहील.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत, १. मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा., पुणे -१
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, ....यांनी एक महिन्याच्या आत सदर शाळांची तपासणी करुन पूर्तता अहवाल सादर करावा.

जा.क्रं./उमाशि-१/मातंमा/२००-
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक :

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
-------------------------------
-------------------------------

विषय :- माहिती तंत्रज्ञान या विषयास मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रं. एसएससी-२००१/(१२४/०१)/उमाशि-२
मुंबई दि. ५. जुलै.२००१
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. --------- यांची शिफारस
दि.   /   /२००

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सन २००   - २००   या शैक्षणिक वर्षापासून खालील अटींच्या अधीन राहून इ. ११ वीस माहिती तंत्रज्ञान विषयास मान्यता देण्यात येत आहे.

माहिती तंत्रज्ञान

| अ.न. | शाखा | इयत्ता | तुकडी क्रमांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | कला | | | कायम विना अनुदान तत्वावर मान्यता |
| २ | वाणिज्य | | | कायम विना अनुदान तत्वावर मान्यता |
| ३ | विज्ञान | | | कायम विना अनुदान तत्वावर मान्यता |

१. विदयार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान हा विषय द्वितीय भाषा ऐवजी किंवा चार वैकल्पिक विषयापैकी एक विषय म्हणून निवडता येईल.
२. संबंधित कनिष्ठ महाविदयालयात किमान १५ अद्यावत (PIII) संगणक असलेली अद्यायावत प्रयोगशाळा असणे आवश्यक आहे. कलर प्रिंटर, कॉम्प्युटर, फॅर्निचर, टेलीफोन सुविधा, प्रोजेक्टर, सीडी ड्राईव्ह इ. साहित्य उपलब्ध असावे.
३. संबंधित विषय शिकविण्यासाठी M.C.A,M.C.S,M.Sc,(Computer) M.C.M, M.Sc, M.A. M.COM.+ADC,SSAA,B.ED,शै.अर्हता असणारे अनुभवी शिक्षक असणे आवश्यक आहे.

४. प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी विज्ञान With Computer XII M.C.V.C. With C.T.अर्हता असणारे अनुभवी शिक्षक असणे आवश्यक आहे.

५. माहिती तंत्रज्ञान विषयाचे माध्यम इंग्रजी राहिल.

६. माहिती तंत्रज्ञान विषयासाठी कनिष्ठ महाविद्यालयांना (संस्थांना) शासनामार्फत अनुदान देण्यात येणार नसल्याने विषय अद्ययन व प्रात्यक्षिक इत्यादीसाठी प्रति विद्यार्थी रु. १२००/- पर्यंत वार्षिक शुल्क आकारण्यास कनिष्ठ महाविद्यालयांना (संस्थांना) अनुमती राहील.

७. इ. १२ वी चे फेब्रुवारी / मार्च परीक्षेचे संबंधित विदयार्थ्यांचे आवेदन पत्र भरतेवेळी सदर विषयाचे परीक्षा शुाल्क रु. २००/- प्रति विद्यार्थी या प्रमाणे आवदेन पत्रासोबत मंडळाकडे भरावे लागेल.

८. मंडळामार्फत प्रथम नोंदणी व विषय मान्यतेसाठी ५० ते ६० विदयार्थ्यांपर्यंतच्या एका तुकडीस रु. ५०००/- नोंदणी व प्रथम मान्यता शुल्क आकारण्यांत येईल.

९. माहिती तंत्रज्ञान विषयासाठी मान्यताबाबत आपण सादर केलेल्या प्रस्तावातील माहिती चुकीची किंवा खोटी असल्याचे आढळल्यास तसेच शासन निर्णय दि. ५.७.२००१ व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे दिनांक १२.७.२००१ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी न केल्यास सदर विषयाची मान्यता रद्द कैली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

जा.क्रं./उमाशि-१/पुवि/मा.तं.मा./०९
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक :

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक
--------------------------------
--------------------------------

विषय :- माहिती तंत्रज्ञान या विषयास चलन भरण्यास मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रं. एसएससी-२००१/(१२४/०१)/उमाशि-२
दि. ५.७.२००१
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. यांची शिफारस दि.

संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास सन २०० - २०० या शैक्षणिक वर्षापासून माहिती तंत्रज्ञान या विषयास इ. ११ वी साठी खालीलप्रमाणे शासन निर्णय क्रं. एसएससी- २००१/ (१२४/०१) /उमाशि-२ दि. ५.७.२००१ अन्वये कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्याचे प्रस्तावीत आहे. तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे एस.एस.सी. बोर्ड पुणे यांचेकडे चलन भरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

इ. ११ वी (माहिती तंत्रज्ञान)

| अ.न. | शाखा | वर्ग/तुकडी क्रमांक | चलनाने भरावयाची रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | कला | | | कायम विना अनुदानित |
| २ | वाणिज्य | | | कायम विना अनुदानित |
| ३ | विज्ञान | | | कायम विना अनुदानित |

शुल्क भरल्याच्या पावतीची सत्यप्रत या कार्यालयास अंतिम मान्यता देण्यासाठी सादर करावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

कायम विनाअनुदान तत्वावर
प्रथम मान्यता आदेश

जा.क्र ऊमाशि – १/पुवि/प्रमाआ / ०९–१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे – १
यांचे कार्यालय
दिनांक :–

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक

______________________

______________________

विषय :– सन २००    –    या शैक्षणिक वर्षी उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी प्रथम मान्यता / नवीन शाखा / वर्ग मंजूर करणे बाबत.

संदर्भ :– १) शासन पत्र क्रमांक एच.एस.सी. १७०८ (१८१ /०८) (   ) उमाशि – १ दिनांक १०.०७.२००८
२) या कर्यालयाकडील जाक्र.उमाशि – १ / न.मान्यता / न.मान्यता/ ११ वी पुवि / २००८ – ०९ २४६६० /७३१, दि. ०८.१०.२००९
३) शासन पत्र क्र. एच.एस.सी. १७०८ / (१८१/०८) (   ) उमाशि – १ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई, दि. २९.०८.२००९
४) संचालनालयाचे पत्र क्र संकिर्ण / २००९ / ३४११६ / याचिका / १५क (८) / ९३४४ , दिनांक २४ सप्टेंबर २००९
५)माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२,३.३,५.१
६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.    यांचे पत्र दि.    /    /०९

संदर्भीय शासन आदेश क्रमांक १ ,२ आणि ५ अन्वये प्राप्त अधिकारानुसार कळविण्यात येते की, सन २००  – या शैक्षणिक वर्षा करिता इयत्ता ११ वी (प्रथम) नवीन वर्गांना कायम विनाअनुदान तत्तावर खालील अटींच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| इयत्ता | शाखा | | | | एकूण तुकड्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | | |
| ११ वी | | | | | | कायम विना अनुदानित मान्यता |
| माध्यम | | | | | | |

अटी :

१. संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. ज्या माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक वर्गांना परवानगी घ्यावयाची आहे अशी माध्यमिक शाळा शासन मान्यता प्राप्त असणे आवश्यक आहे.
२. उच्च माध्यमिक वर्गाला शासनाची **कायम विनाअनुदान तत्वावर** मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
३. शासनाने विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी ठरवून दिलेले **शिक्षण शुल्क** आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही जादा शुल्क आकारता येणार नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी नसाव्यात. संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नसावे.

५. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एच.एस.सी. / १०४६ / ४१९ / २०२१ दिनांक ०५/०६/७६ व त्यानंतर वेळोवेळी विहित केलेल्या अटींच्या पूर्ततेवर म्हणजेच सरासरी हजेरी, शाळागृहांच्या खोल्या व इतर भौतिक सुविधा, शैक्षणिक पात्रता धारण करणारे प्रशिक्षित शिक्षक, शैक्षणिक साहित्य , विज्ञान प्रयोगशाळा इत्यांदींची पूर्तता करण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे. सदर वर्ग सुरु केला असल्यास पटसंख्या व सरासरी हजेरी.कळवावी.

६. इयत्ता ११ वी चे अतिरिक्त वर्ग तुकड्या बाबत शासन पत्र, शालेय शिक्षण विभाग मंत्रालय , यांचे क्र. एच.एस.सी. – १७०० / (२१०१)/ ००) उमाशि – १, दिनांक २१ सप्टेंबर २००० मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यात यावी.

७. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली उच्च माध्यमिक शाळा असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावावा. संस्थेने संबंधित अधिकाऱ्याशी / शासनाशी पत्रव्यवहार करताना **'कायम विनाअनुदानित शाळा'** अशा प्रकारे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

८. शाळेतील ११ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास ८०विद्यार्थ्यांची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयांना जोडली असल्यास १२० विद्यार्थ्यांची एक तुकडी या सुत्रानुसार मंजूर असावी.

९. पुढील वर्षी नैसर्गिक वाढीने इ. १२ वी चा वर्ग सुरु करावयाचा असल्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेमार्फत प्राचार्यांनी मुख्याध्यापकानी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावा. शासनाच्या परवानगीशिवाय वर्ग सुरु ठेवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्यावर / मुख्याध्यापकावर राहील आणि अनाधिकृत वर्गाबाबत शासनाने ठरवून दिलेल्या कारवाईस ते पात्र ठरतील.

१०. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९७७ व त्याखालील नियमावली १९८१ मधील तरतुर्दीचे काटेकोरपणे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

११. जनहितार्थ या.क्र ४८३/ ०४ मध्ये सर्वेच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पुर्तता करावी.

१. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत.
३. कनिष्ठ महाविद्यायाचा संबंधीत कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत सर्व दृष्टिकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री करण्यात यावी. तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.
५. प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीचे सुरक्षिततेच्या दृष्टिने नियमित तापसणी करण्यात यावी. संबंधीत अधिकारी यांनी (National Building Code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी / कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

१२. सदरचा प्रथम मान्यतेचा कालावधी संपलेनंतर पुनश्च: प्रथम मान्यता घेणेसाठी नव्याने प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.

शिक्षणउपसंचालक
पुणे विभाग, पुणे – १

प्रत,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जि.प. पुणे / सोलापूर / अहमदनगर

कायम विनाअनुदान तत्वावर

जा.क्र ऊमाशि – १/अति शाखा/जा.तु./नै.वाढ मा/२००९–२०१०
शिक्षण उपसंचालक कार्यालय , पुणे विभाग, पुणे
दिनांक :–

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य

विषय :– कायम विनाअनुदानीत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००९–२०१० शैक्षणिक वर्षा पासून इयत्ता १२ वी नैसर्गिक वाढ वर्ग मंजुरी.

संदर्भ :– १) शासन पत्र क्र एच एस सी १७०८/(१८१/०८) उ मा शी १ दि.१०.०७.२००८
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक उ मा शी १ / ११ वी नवीन मान्यता /दि.
३) शिक्षण अधिकारी माध्य. जि.प. यांचे पत्र क्र. दि.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास शासन निर्णय दिनांक २१.१२.२००० मधील आणि त्याशिवाय खालील अटींच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २००९–२०१० पासून **कायम विनाअनुदान तत्वावर** खाली नमुद केलेली / केलेल्या अतिरिक्त / जादा शाखा / तुकडी / तुकड्या नैसर्गिक वाढीने इ.१२ वी वर्गासाठी मंजुर करण्यात येत आहे / आहेत.

इयत्ता १२ वी

| अ.नं | माध्य व उच्च माध्य / कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता | शाखा इ. १२ वी | तुकडी क्र | माध्यम | कायम विनाअनुदानित तत्वावर वर्ग मंजुरीचे वर्ष . | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | कला | | | २००९–२०१० | कायम विनाअुनदानित तत्वावर वर्ग मान्यता |
| | | वाणिज्य | | | | |
| | | विज्ञान | | | | |
| | | संयुक्त | | | | |

अटी व शर्ती

१. जुलै/ ऑगस्ट मधील पटपडताळणीनंतर मान्य केलेल्या पटावर वरील तुकडी मंजुर केलेली आहे. मान्य पटापेक्षा कमी पट असल्यास / आढळल्यास सदर तुकडी नादेय राहील.
२. सदर तुकडीचा आदेश प्राप्त होताच तुकडी / तुकड्या सुरु असल्याचा अहवाल हा मुख्याध्यापकाने / प्राचार्यांने शिक्षण अधिकारी / शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठवावा. अन्यथा सदर तुकडी चालू नाही असे गृहीत धरुन ती अग्राह्य धरली जाईल. अशा अग्राह्य वर्ग/ तुकडीस आवश्यकता भासल्यास सदर वर्ग/तुकडीस पुर्नजिवीतसाठी विहीत नमुन्यात शिक्षण अधिकारी माध्यमिक मार्फत प्रस्ताव या कार्यालयास सदर वर्ग/तुकडी सुरु केल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करावा.
३. सदर तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांचे संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता विषयक प्रस्ताव आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत विभागीय शिक्षण उपसंचालक कळवतील त्या ठिकाणी शिबीरामध्ये दाखल करणे. उच्च माध्यमिक शाळा / क.म.वि. यांचेवर बंधनकारक राहील.
४. पुढील शैक्षणिक वर्षी सदर मंजुर तुकडी चालू राहणाऱ्या सदर वर्गाच्या तुकडीस निकषापेक्षा पट कमी झाल्यास ती तुकडी मुख्याध्यापकांनी / प्राचार्यांनी त त्काळ बंद झाल्याचे शिक्षण अधिकरी / शिक्षण उपसंचालक कार्यालयास कळवावे.
५. इयत्ता १२ वी चे उच्च माध्यमिकचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास ८० विद्यार्थांची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेले असल्यास १२० विद्यार्थांची एक तुकडी समजण्यात येईल.
६. सदर वर्गास शासनाची **कायम विनाअुनदान तत्वावर** मंजुरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान किंवा कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही या अटीच्या अधिन राहून उपरोक्त वर्ग मान्यता देण्यात येत आहे.
७. शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेकडून बंधनकारक राहील.

शिक्षणउपसंचालक
पुणे विभाग, पुणे – १

जाक्र.उमाशि-१/पुवि/अनु./मान्यता/०८-०९
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

प्रति

प्राचार्य/मुख्याध्यापक,
- - - - - - - - - - - - - - - - - - ,
- - - - - - - - - - - - - - - - - ,
- - - - - - - - - - - - - - - - .

<u>विषय</u> : उच्च माध्यमिक बिगर आदिवासी क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयीन प्रथम/ द्वितीय वर्षाचे नविन/जादा/अतिरिक्त शाखा वर्ग अंशतः अनुदान तत्वावर सन २००८-०९ साठी पुढील अनुदान टप्पा मंजूरीबाबत. . . .

संदर्भ :
१. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. नमाशा/१०९९/(१०७६/९९)/ माशि-१, दि. ११.१०.२०००
२. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एचएससी/१७०३/(२१४/०३) उमाशि-१, दि. २२.१.२००४
३. मा. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक- एचएससी/१३-२०००/०३-०४/अनुदान/१२ एचएस, दि. ३०.१.०४
४. शासन निर्णय एचएससी/१७०६/(३८०५४/(३५२/०६)उमाशि-१, दिनांक-७.२.२००८.
५. मा. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक- एचएससी/१३-२०००/०७-०८/अनु/१२ एच.एस./३३४८, दि. १५.२.०८

आपल्या संस्थेच्या मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विनाअनुदान तत्वावर मंजूर केलेल्या प्रथम/द्वितीय वर्षाच्या तुकडीला शासनाने तसेच संचालनालयाने संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या अधिकारानुसार चालू आर्थिक वर्ष २००८-०९ करिता नियमाप्रमाणे खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| इयत्ता | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | एकूण | २००८-०९ मधील देण्यात आलेला अनुदानाचा टप्पा | २००९-१० मध्ये मंजूर करण्यात आलेला अनुदानाचा टप्पा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ वी | | | | | | | |
| १२ वी | | | | | | | |

सदरच्या तुकड्यांना विद्यार्थ्यांची हजेरी, शैक्षणिक अर्हता, प्राप्त शिक्षक वर्ग, शैक्षणिक सुविधा इमारत इ. बाबीच्या अटीवर अनुदान तत्वावर आणण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे तुकड्या अनुदानावर आलेल्या आहे. सन २००८-०९ मध्ये या कार्यालयाने मंजूर वर्ग तुकड्या व त्यामधील प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या व पटपडताळणीनुसार शिक्षार्थ कपात लागू केलेल्या वर्ग व तुकड्यांचे अनुदानातून सदर रकमेची वजावट करण्यात येईल.

सोबत दिलेल्या परिपत्रकानुसार अनुदानावर आलेल्या तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षकांची मान्यता वेळेत घेण्यात यावी व देयके वेतनपथकाकडे सादर करावे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रतिलिपी :मा. शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्यमिक),
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१. यांना माहितीसाठी सादर.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर.
यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेशित. तसेच सुचित करण्यात येते की, वरील वर्ग पुढील अनुदान टप्प्यावर आणण्याची कार्यवाही करण्यात आली असल्यामुळे सदर तुकडीवर कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्याचे वेतन उपलब्ध निधीतून अदा करण्यात यावे व निधी कमतरता असल्यास आवश्यक त्या तरतुदीची मागणी अदाजपत्रकात न चुकता करण्यात यावी.
३. अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर.
यांना सूचित करण्यात येते की, उपोक्त अनुदान टप्प्यावर आणलेल्या तुकडीवर नियुक्त कर्मचाऱ्यांची वेतन देयके उपलब्ध निधीतून अदा करावीत. जादा निधीची आवश्यकता असल्यास अंदाजपत्रकात मागणी न चुकता करण्यात यावी.

**कायम विनाअुनदानीत**

जा.क्र.उमाशी–१/नविन मान्यता इ. ११वी/पुवि/२०० –
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे – १ यांचे कार्यालय
दिनांक :–

प्रति,

विषय :– सन २०० – या शैक्षणिक वर्षात नवीन उच्च माध्यमिक इयत्ता ११वी च्या वर्गास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देणेबाबत.....

संदर्भ :

१) शासन निर्णय , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक – नमाशा २००८/(५४६/०८)/मशि १, दिनांक ३ जुलै, २००८

२) क्रमांक एच.एस.सी./१७०८/(१८१/०८ (ब ), उमाशि – १ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२, दि. २९ ऑगस्ट २००९

३) क्रमांक एच.एस.सी./१७०८/(१८१/०८ (ब ), उमाशि – १ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२, दि. १७ फेब्रुवारी २०१०

४) क्र. एच एस सी / नशा प्र/२००८–०९/शा.मा./१२एच एस/२२५६ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय म.रा.पुणे दि. २५.०२.२०१०

५) संचालनालयाचे पत्र क्र संकिर्ण / २००९ / ६४११६ / याचिका / १५क (८) / ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर २००९

६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे पत्र क्रमांक कार्या – ६/उमा/८५३/२००९, दिनांक १०.११.२००९

७) माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२,३.३,५.१.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, आपल्या उच्च माध्यमिक शाळेस शासन पत्र क्रमांक एचएससी १७०८/(१८१/०८)(ब) उमाशि – १ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई – ३२, दि. १७ फेब्रुवारी २०१० मधील व त्याशिवाय खालील अटींच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २००८– २००९ पासून कायम विनाअनुदान तत्वावर अमृतेश्वर विद्यालय, संगमनेर खुर्द, ता.संगमनेर, जि.अहमदनगर या विदयालयास खालील नमूद केलेल्या इयत्ता ११ वी साठी परवानगी देण्याचे विचाराधीन आहे.

सदर संस्थेने माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी चे वर्ग खालीलप्रमाणे सुरु करण्यांस परवानगी देण्याचे विचाराधीन आहे.

| इयत्ता | शाखा | | | | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | | |
| इयत्ता ११ वी | प्रथम | प्रथम | प्रथम | – | तीन | कायम विना–अुनदान तत्वावर मान्यता सन २००८–०९ |
| माध्यम | मराठी | इंग्रजी | मराठी | – | – | |

अटी :

१. सदर संस्थांना मान्य केलेल्या उच्च माध्यमिक वर्गांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत आहे. भविष्यात कधीही अनुदान , किंवा कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत किंवा फी चा परतावा दिला जाणार नाही. याबाबत चे संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांचेकडून लेखी रुपये १०/–कोर्ट फी स्टॅम्प लिहून घेणे आवश्यक राहील.

२. सदर उच्च माध्यमिक शाळेस शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनिमय अधिनियम १९७७ व त्याखालील नियमावली १९८१ मधील तरतुदीची काटेकोरपणे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. शासनाच्या पुर्वपरवानगीने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिक शुल्क विद्यार्थ्यांकडून संस्थेस आकारता येणार नाही.

४. संस्थेच्या अध्यक्षाने कायम विनाअनुदान तत्वावर उच्च माध्यमिकचे वर्ग चालविण्यास तयार असलेबाबत रुपये १०० च्या कोर्ट स्टॅम्प पेपरवर शपथपत्र देणेबाबत बंधनकारक राहील.

५. सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

६. कायम विनाअुनदान तत्वावर परवानगी मिळालेली 'उच्च माध्यमिक शाळा' असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे संबंधीत संस्थेवर बंधनकारक राहील.

७. कायम विनाअनुदानीत शाळा' अशा प्रकारचे लेटरहेड सदर संस्थेने नियमित वापरणे आवश्यक आहे.

८. संबंधीत संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम ,१८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

९. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही असे हमीपत्र सादर करावे लागेल. संस्थेकडून विहीत मुदतीत चलन व प्रस्ताव दाखल करण्यात आलेला असला पाहिजे.

१०. प्रस्तुत संस्थेस इयत्ता ११वी चे वर्ग सुरु करण्यास दिलेल्या परवानगीने परिसरातील सध्या सुरु असलेल्या उच्च माध्यमिक शाळांच्या / कनिष्ठ महाविद्यालयांच्या पटसंख्येवर विपरीत परिणाम होणार नाही. ही बाब संस्थेवर बंधनकारक राहील.

११. जनहितार्थ या.क्र ४८३/ ०४ मध्ये सर्वेच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पुर्तता करावी.

१. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२. कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत.

३. कनिष्ठ महाविद्यायाचा संबंधीत कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत सर्व दृष्टिकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री करण्यात यावी. तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

५. प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीचे सुरक्षिततेच्या दृष्टिने नियमित तापसणी करण्यात यावी. संबंधीत अधिकारी यांनी (National Building Code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी / कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे – १

प्रत,

१. मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय म.रा.पुणे – १

२.शिक्षण अधिकारी माध्यमिक जि.प.अहमदनगर यांनी एक महिन्याच्या आत सदर शाळांची तपासणी करुन पुर्तता अहवाल सादर करावा